# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


## हमाल, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, गट-ड

**धारिका क्रमांक : २४/चतुर्थश्रेणी/२०१५/पाच** **जाहिरात क्रमांक : १४४/२०१५**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या आस्थापनेवरील **हमाल, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, गट-ड** च्या एकूण **पाच** पदांसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदांसाठी खालील अटी व अर्हतांची पूर्तता करणारे उमेदवार अर्ज करू शकतात.

**२. उपलब्ध पदसंख्या :- ५**

| जात प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | एकूण मागासवर्गीय | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | ३ | ५ |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक /समांतर आरक्षणाचे विवरणपत्र खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १ | -- | १ | -- | -- | -- | -- | -- | २ | १ | ३ |
| अ) महिला (३०%) | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| ब) माजी सैनिक | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १ |
| क) विकलांग (३%) | श्रवणशक्तीतील दोष - १ पद | | | | | | | | | | |

<u>टीप</u> : शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक **३०** एप्रिल, **२००५** च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगास खेळाडू आरक्षण लागू केलेले नाही. यास्तव, खेळाडू आरक्षण दर्शविण्यात आलेले नाही.

२.१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक मलोआ-१०११/१२५१/१०/प्र.क्र.५/२०११/आठ, दिनांक १३ जानेवारी, २०११ नुसार खालील अंपगत्व असलेले उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

अ) अंधत्व किंवा क्षीणदृष्टी (Blindness or low vision)

ब) श्रवणशक्तीतील दोष (Hearing impainment)

क) चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायू (Lecomotor disability or Cerebral palsy)

२.२ विकलांग उमेदवारांची पात्रता शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आहे. विकलांग उमेदवारासाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असेल.

२.३ विकलांग उमेदवाराची आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

२.४ समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येईल.

२.५ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग व अमागास (महिला) इ. वर्गवारीत मोडणाऱ्या उमेदवारांनी उत्पन्नाच्या आधारे समाजातील उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२.६ वि.जा.(अ) वर्गवारीसाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असून आरक्षित पदासाठी संबंधित वर्गवारीतील योग्य व पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अद्ययावत शासन धोरणाप्रमाणे भ.ज.(ब), भ.ज.(क) व भ.ज.(ड) या उपलब्ध वर्गवारीच्या उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारावर करण्यात येईल.

३. हमाल संवर्गातील महिला व माजी सैनिकासाठी आरक्षित असलेली पदे संबंधित वर्गवारीतील भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असेल.

४. उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान आवश्यक आहे.

५. महिला उमेदवारांचे अर्ज प्राप्त न झाल्यास पुरुष उमेदवारांचा विचार केला जाईल. सदर कार्यवाही शासन परिपत्रक, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राहील.

६. आयोगाच्या नवीन धोरणानुसार मागासवर्गीय उमेदवारांना वयोमर्यादा, परीक्षा शुल्क व पात्रतेच्या निकषांमध्ये सवलत किंवा सूट याचा फायदा दिल्यास अशा उमेदवारांची सर्वसाधारण (अमागास) वर्गवारीच्या पदावर शिफारस करण्यात येत नाही.

**७.** वेतनश्रेणी : **४४४०-७४४० + १३०० ग्रेड पे. एकूण वित्तलब्धी अंदाजित रु. १३०००/-**

८. पात्रतेच्या अटी :

८.१ नागरीकत्व : भारतीय

८.२ वयोमर्यादा : **दिनांक १ एप्रिल, २०१६** रोजी किमान १८ वर्षे असावे व कमाल ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे.

८.३ उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम. तथापि, वयोमर्यादा सवलतीचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांना कोणतीही एकच उच्चतम वयोमर्यादेची सवलत देय राहील.

८.३.१ महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांच्या बाबतीत ०५ वर्षापर्यत.

८.३.२ अपंग उमेदवारांच्या बाबतीत ४५ वर्षापर्यत.

८.३.३ माजी सैनिक उमेदवाराच्या बाबतीत वयोमर्यादा शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० आणि तद्नंतर शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार राहील.

९. शैक्षणिक अर्हता : शासनमान्य शाळेमधून इयत्ता ४ थी उत्तीर्ण.

१०. प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता किमान असून, किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलावण्याकरिता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा जादा शैक्षणिक अर्हता यांच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा **चाळणी परीक्षेद्वारे** मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येतील. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पध्दत, आरक्षण, वयोमर्यादा, निवडीची सर्वसाधारण प्रक्रीया इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशिलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

११. जे उमेदवार चुकीची व खोटी माहिती सादर करतील त्यांना या व पुढील सर्व निवडीसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

**१२. कर्तव्ये व जबाबदाऱ्या :-**

प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१३. **शुल्क** :

| | | | |
|---|---|---|---|
| १३.१ | अमागास | - | ३७३/- |
| १३.२ | मागासवर्गीय | - | २७३/- |
| १३.३ | माजी सैनिक | - | २३/- |

१४. **अर्ज करण्याची पध्दत :**

१४.१ प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

१४.२ पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज https://mahampsc.mahaonline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक १५ डिसेंबर, २०१५ ते दिनांक ४ जानेवारी, २०१६** या कालावधीतच सादर करणे आवश्यक राहील.

१४.३ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

१४.४ विहीत पध्दतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर विहीत मुदतीत शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१४.५ आयोगाने निश्चित केलेले शुल्क खालील पध्दतीने भरता येईल.
(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे, (२) नेट बँकिंग (३) डेबीट कार्ड (४) क्रेडीट कार्ड
(५) संग्राम केंद्र/सीएससी (नागरिक सेवा केंद्र)

१४.६ https://mahampsc.mahaonline.gov.in येथे संग्राम केंद्र (ग्रामपंचायतीमध्ये) आणि सीएससी ची सूची उपलब्ध आहे.

१४.७ परीक्षा शुल्काचा भरणा करण्याकरिता उमेदवारांनी खाली नमूद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

१४.७.१. शुल्क भरण्या करिता मुख्य पुष्ठाच्या डाव्या भागावरील "माझे खाते" या लिंक वर क्लिक करावे.

१४.७.२. “माझे खाते” या लिंक वर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेल्या पदांची यादी शुल्क् भरल्याच्या न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर "Unpaid"असे लिहलेले असेल, त्या ठिकाणी ‘Pay Now’ अशी लिंक उपलब्ध असेल.

१४.७.३. ‘Pay Now’ या लिंक वर क्लिक केल्यानंतर ३ पर्याय उपलब्ध होतील.
(१) ऑनलाईन पेमेंट (२) नागरी सुविधा केंद्र (३) चलनाद्वारे

१४.७.४. उमेदवार क्रेडीट कार्ड, डेबीट कार्ड अथवा नेट बँकिंगच्या साहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील

१४.७.५. नागरी सुविधा क्रेंद्र हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या पावतीची प्रत घेऊन नागरी सुविधा क्रेंद्र अथवा संग्राम केंद्रात जाऊन शुल्क भरणा केला जाऊ शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक राहील.

१४.७.६. उमेदवाराने चलनाद्वारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध् होणा-या चलानची प्रत घेऊन भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्क भरणे आवश्यक आहे.

१४.७.७. ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे आहे, अशा उमेदवारांनी अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१४.७.८. ऑनलाईन पध्दतीने आयोगास अर्ज सादर करताना शाळा सोडल्याच्या दाखल्यावर असलेल्या नावाप्रमाणेच नोंदणी करणे व आयोगास अर्ज/माहिती सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, आयोगाच्या सूचनांचे उल्लंघन समजून कारवाई करण्यात येईल.

१५. चाळणी परीक्षा घ्यावयाची ठरल्यास सदर परीक्षेच्या अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर व परीक्षेपूर्वी ०७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेशपत्र त्याच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने परीक्षेपूर्वी डाउनलोड करुन घेणे व परीक्षेच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. परीक्षेच्यावेळी विकलांग उमेदवारांना गुणवत्तेनुसार लेखनिकाची मदत घेता येईल. तथापि, अर्ज स्वीकारण्याच्या दिनांकापासून ७ दिवसांच्या आत यासंदर्भात आयोगास स्वतंत्ररित्या पत्राद्वारे विनंती करणे अनिवार्य आहे.

१६. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे, त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१७. आयोगाच्या कार्यालयात ,परीक्षा कक्षात, परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच मुलाखतीच्या वेळी मोबाईल फोन अथवा इतर कोणत्याही प्रकारची इलेक्ट्रॉनिक साधने आणण्यास व वापरण्यास सक्त मनाई आहे.

१८. उमेदवाराने मुलाखतीच्यावेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१९. विहीत पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही, तसेच भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही **दिनांक ४ जानेवारी, २०१६** रोजी २३.५९ वाजेपर्यत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

२०. चलनाद्वारे शुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये **दिनांक ५ जानेवारी, २०१६** पर्यत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे. विहित दिनांकानंतर शुल्क भरल्यास वैध मानले जाणार नाही, तसेच शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

**सु. ना. हनुमंते**
सह सचिव,
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

ठिकाण : मुंबई
दिनांक : १५ डिसेंबर, २०१५.